# Ashadhi Ekadashi Celebration



लोकमत

# विठ्ठलनामाची शाळा भरली

महावीर इंग्लिश मीडिअम स्कूल, गुलटेकडी

पुणे : गुलटेकडी येथील महावीर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशी कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. विद्यार्थ्यांनी 'जय हरी विठ्ठल' नामाच्या गजर करत वातावरण भक्तिमय केले. यावेळी प्राचार्या डॉ. पल्लवी सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी संत ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताई यांची पालखी फेसबुकला लाईव्ह दाखवली. भजन, अभंग तसेच नाच यांद्वारे गोरा कुंभाराची गोष्ट सादर केली. मुलांनी संतांची माहिती सांगून संपूर्ण शाळा



पुण्य नगरी

# श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त महावीर स्कूलमध्ये अवतरले 'बाल राधा–कृष्ण'

पुणे : पुण्यातील महावीर इंग्लिश मीडियम स्कूल, सॅलिसबरी पार्कमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम बालगोपाळांच्या विविधांगी सादरीकरणाने अत्यंत उत्साहात साजरा झाला. प्री-प्रायमरीच्या शिक्षकांनी 'श्रीकृष्ण-सुदामा यांची भेट' ही नाट्यछटा सादर करून आदर्श मित्रप्रेमाचा संदेश दिला.

यावेळी प्रि-प्रायमरीच्या सर्व बालचमुंनी 'राधा- कृष्णाची वेशभूषा' केली होती व हेच या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. तसेच, प्रायमरीच्या मुलांनी कृष्णभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच, अतिशय सुंदर असे सूत्रसंचालन देखील प्रायमरीच्याच मुलांनी केले होते, हे पाहून मुख्याध्यापिका डॉ. पल्लवी सोमण यांना विशेष कौतुक वाटले. प्रायमरीच्या मुले आणि मुली यांनी एकावर एक मनोरे रचून शिस्तबद्ध पद्धतीने दहीहंडी फोडून 'हाथी घोडा पालखी जय कन्हैया लाल की'चा जयघोष करून आनंदाने नाचली. गोपाळकाल्याचा प्रसाद सर्वांना वाटला. याकामी क्रीडा शिक्षकांनी मेहनत घेतली. मुख्याध्यापिका डॉ. पल्लवी सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी कल्चरल कमिटीच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली होती.

Smart Pune Edition